महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक- १४४२/समोवानि/२०२०/२४ दिनांक:- ९ फेब्रुवारी, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०२० करीता उपस्थित व खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी क्रीडाविषयक कागदपत्रे सादर करण्याबाबत**

**संदर्भ:- जाहिरात/अधिसुचना क्रमांक ०५९/२०२१, दिनांक २ सप्टेंबर, २०२१**

सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०२० या परीक्षेस उपस्थित खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांकडून त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ त्यांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल/पोचपावती यांच्या प्रती यापूर्वी पूर्व परीक्षेच्या निकालप्रक्रियेदरम्यान मागविण्यात आल्या होत्या. सदर क्रीडाविषयक प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेकरीता प्रवेश देण्यात आला आहे.

२. खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या व मुख्य परीक्षेस उपस्थित असणाऱ्या उमेदवारांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्रांची तपासणी सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत शिफारशीपूर्वी करण्यात येणार आहे. यास्तव सदर मुख्य परीक्षेकरीता खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या व परीक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या सदराखालील 'Upload Documents' या लिंकद्वारे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे :-

(१) सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले/ली खेळाचे/ची प्राविण्य प्रमाणपत्र

**आणि**

(२) दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० पूर्वीचा सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल

**किंवा**

(३) दिनांक २० सप्टेंबर, २०२१ पूर्वीचा सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल **व** दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० पुर्वी सक्षम क्रीडा प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती.

३. उपरोक्त प्रमाणपत्रे/अहवाल/पोचपावती इत्यादी कागदपत्रे अपलोड करण्यापूर्वी सदर कागदपत्रांवर उमेदवाराने स्वत:चे नाव, परीक्षेचे नाव, बैठक क्रमांक, अर्ज नोंदणी क्रमांक इ. नमूद करून प्रथम स्वसाक्षांकित करावे व त्यानंतर सर्व कागदपत्रे स्कॅन करुन एकच PDF फाईल तयार करावी..

४. आयोगास सादर केलेल्या कागदपत्रे / प्रमाणपत्राच्या आधारे एखादा उमेदवार अपात्र ठरल्यास त्याचा खेळाडू आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल.

५. उपरोक्तप्रमाणे प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता उपस्थित खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक कागदपत्रांच्या स्कॅन प्रती अपलोड करण्याकरीताची वेबलिंक **दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत** सुरु राहील.

उपसचिव (परीक्षोत्तर-अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग